जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -३५४ दिनांक - १२/०५/२०२३**

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर

## जुगार अड्डयावर छापा टाकुन ०८ इसमावर कारवाई करून रोख १७,३२०/- रू. चा मुद्देमाल जप्त.

दि.११.०५.२०२३ रोजी ताडीवालारोड बंडगार्डन, पुणे परीसरात काही इसम बेकायदेशीरपणे कल्याण मटका जुगार खेळत व खेळवत असले बाबत प्राप्त झालेल्या गोपनिय बातमीदार मार्फतीने खात्रीशीर बातमी मिळाली.

सदर ठिकाणी सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे, शाखेकडील अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी गोपनियरित्या पाळत ठेवुन छापा टाकला असता काही इसम बेकायदेशीरपणे कल्याण मटका जुगार पैसे लावुन खेळत व खेळवत असल्याचे मिळुन आल्याने ०७ इसमांना ताब्यात घेवुन त्यांचे कडून जुगारातील रोख रक्कम, व जुगाराचे साहित्य असा एकुण १७,३२०/- रू.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी जुगार खेळताना मिळुन आलेले इसम व ०१ पाहिजे आरोपी अशा ०८ इसमांविरूध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गुरनं १४५ /२०२३ महाराष्ट्र जुगार बंदी अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला व त्यांना पुढील कारवाई करीता बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. रितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर श्री. संदिप कर्णिक, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, श्री रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. अमोल झेंडे, यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. भरत जाधव तसेच सपोनि अश्विनी पाटील, सपोनि अनिकेत पोटे, पोलीस अंमलदार अजय राणे, मनिषा पुकाळे, किशोर भुजबळ, संदीप कोळगे, ओंकार कुंभार या पथकाने यशस्वी केली आहे.